## निधन वार्ता

### प्रकाश महादू महाजन; आज अंत्ययात्रा



**लासूर, ता.चोपडा । वार्ताहर ।** येथील रहिवासी नरेंद्र व रवींद्र प्रकाश महाजन यांचे वडील प्रकाश महादू महाजन (आप्पा मिस्तरी) यांचे दि.४ रोजी दुपारी ३ वाजता अल्पश: आजाराने निधन झाले. त्यांची अंतयात्रा आज शनिवार दि.५ जून रोजी सकाळी १० वाजता लासूर येथील राहत्या घरुन निघेल.

### हरी वायकोळे : आज अंत्ययात्रा




**चिनावल । वार्ताहर ।** चिनावल येथील रहिवासी हरी नारायण वायकोळे (वय ७०) यांचे दि.४ जनू रोजी अल्पशः आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा दि.५ जून रोजी सकाळी ९ वाजता राहत्या घरून निघेल. ते मयूर व केतन वायकोळे यांचे वडील होत.

### सुशीला महाजन : आज अंत्ययात्रा



**पारोळा । प्रतिनिधी ।** शहरातील गुलाबबाबा कॉलनी येथील गं.भा. सुशीलाबाई गोकुळ महाजन (वय ७५) यांचे दि. ४ जून शुक्रवारी वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा दि. ५ जून रोजी शनिवारी सकाळी १० वाजता संत गुलाबबाबा कॉलनी पारोळा येथून निघणार आहे. त्या अनिल महाजन, कपिल महाजन यांच्या मातोश्री होत.



### नारायण भाईदास पाटील

**वेले, ता.चोपडा । वार्ताहर ।** चौधरी वाडा येथील रहिवासी, माजी उपसरपंच नारायण भाईदास पाटील (वय ५९ ) यांचे दि.३ रोजी रात्री ८.३० वाजता अल्पश: आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, दोन भाऊ, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते सुधाकर नामदेव पाटील यांचे पुतणे व माजी उपसरपंच रघुनाथ भाईदास पाटील, विनोद पाटील यांचे मोठे बंधू तर प्रमोद पाटील यांचे वडील होत.



### बी.जी.लोहार

**जळगाव । प्रतिनिधी ।** येथील वीरेंद्र बन्सीलाल लोहार यांचे वडील लोहार समाजातील एक नामवंत व्यक्तिमत्त्व तसेच महासंघ व इतर संस्थांमध्ये अग्रक्रमाने कार्य करणारे, समाजसेवक, सेवानिवृत्त सरकारी ऑडिटर बी.जी.लोहार यांचे दि.२७ रोजी ११ वाजता अल्पश: आजाराने निधन झाले.

## अंतुर्ली येथील प्रदीप भालचंद्र पाटील राष्ट्रभक्ती महाराष्ट्र गौरव राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित



अंतुर्ली, ता.मुक्ताईनगर । वार्ताहर

येथील रहिवासी व पुणे येथे कंपनीमध्ये कार्यरत असलेले प्रदीप भालचंद्र पाटील (निकम) हे राष्ट्रभक्ती महाराष्ट्र गौरव राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित झाले .हा पुरस्कार प्रदीप पाटील (निकम) यांना वैद्यकीय मदत व समाजसेवा या विभागासाठी मिळाला .हा पुरस्कार प्रदीप पाटील (निकम) यांना दिनांक २६ जून २०२५ रोजी आशुबा खेडकर सर यांच्या शुभहस्ते पुणे येथे मिळाला .राष्ट्रभक्ती परिवाराचे संयोजक सुनील सुरेश गोरे यांनी प्रदीप पाटील (निकम) यांच्या रुग्णसेवा व समाजसेवेच्या कार्याची दखल घेतली .प्रदीप पाटील (निकम) यांनी आरोग्य क्षेत्रामध्ये काम करत असताना आतापर्यंत महाराष्ट्रातील ३० जिल्ह्यांमधील ४५० रुग्णांना त्यांचे प्राण वाचवून पैसे वाचवून आधार दिला या वैद्यकीय मदत व समाजसेवेमुळे प्रदीप पाटील (निकम) यांना हा राज्यस्तरीय पुरस्कार मिळाला यामुळे सर्वत्र प्रदीप पाटील (निकम) यांचे अभिनंदन व कौतुक होत आहे.

पान १ वरुन ...

### बदल घडवणे पालकांच्या हाती

त्यावर वाचनाशी संबंधित अनेक उपक्रम चालतात. अनेक वाचन ऍप उपलब्ध आहेत. त्यावर पुस्तके वाचता येतात. तथापि हा बदल घडून यावा व मुलांना वाचनाची सवय लागावी, असे वाटत असल्यास ती सवय आधी पालकांनी स्वतःला लावून घेतली पाहिजे. त्यासाठी पालकांना स्वतःला बदलावे लागेल. मोबाईलला काही काळ बाजूला ठेवावे लागेल. तरच मुलांवर वाचनसंस्कार करता येतील.

### सरपंच पुत्रासह तिघांनी केला खून

मोरदंड तांडा येथील रहिवासी जगदीश झुलाल ठाकरे वय ४२ हा असल्याचे निष्पन्न झाले. या घटनेप्रकरणी मयताची पत्नी अरूणा जगदीश ठाकरे हिने ग्रामीण पोलिसात तक्रार देऊन आपल्या पतीचे अशोक मगन मराठे रा.मोरदड जि.धुळे , शुभम संभाजी सावंत रा.पुणे मूळ राहणार मोरदड आणि एक चोवीस वर्षीय अनोळखी मुलगा अश्या तिघांनी माझ्या पतीला मोरदड येथील राहत्या घरून घेऊन जात खून करण्याच्या उद्देशाने त्याचे अपहरण केल्याचे तक्रारीत म्हटले होते.

### कुणाचीही गुंडगिरी खपवून घेणार नाही!

फडणवीसांनी ठणकावून सांगितले. मीरा भायंदर येथील व्यापाऱ्यास मारहाण करणाऱ्यांवर गुन्हा दाखल झाला आहे. एखादा मराठी व्यापारी आसाममध्ये जाऊन भाषा शिकायला वेळ लागत असेल तर त्याला मारहाण करणार का, असा सवालही फडणवीसांनी उपस्थित केला. खरा अभिमान असेल तर मराठी भाषा शिकवा, क्लासेस घ्या, इंग्रजीला का मग गळे लावता. स्वत:च्या मुलांना इंग्रजी शाळेत टाकायचे आणि मराठीसाठी गळा काढायचा, असे म्हणत ठाकरे बंधूंवर अप्रत्यक्षपणे टीका केली.

### मलकापूर तालुका वंचितच्या आंदोलनाचे यश

मलकापूर । ग्राम झोडगा येथील गावकऱ्यांच्या मूलभूत समस्या तसेच जिल्हा परिषद शाळेसमोरील गतिरोधकांसाठी २५ जून रोजी वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष अजय सावळे यांच्या नेतृत्वात तसेच तालुका महासचिव भीमराव नितोने, जिल्हा संघटक भाऊराव उमाळे यांनी निवेदन देण्यात आले होते त्या आंदोलनाला यश आले आहे.

## खरीप हंगामात शेतकऱ्यांना मुबलक खत पुरवठा अन् किंमत स्थिर ठेवा - पी.ए.पाटील

गुढे, ता.भडगाव । वार्ताहर

गेल्या एक ते दीड महिन्याभरापूर्वी शेतकऱ्यांनी मान्सून पुर्व कपाशीची ठिंबक सिंचनवर तसेच सरी ओल पध्दतीने लागवड केली आहे तसेच काही जिरायती शेतकऱ्यांनी मृगाच्या ११, जूनला झालेल्या पावसावर कपाशी मका व पेरणी आटोपली असून आतापर्यंत पाऊस सर्व साधारणपणे झाला असून आता खरिप हंगामाची पिकांची आंतरमशागत कामे मोठ्या प्रमाणवर सुरू असून फक्त वेळेवर पुरेसा पाऊस पडण्याची प्रतिक्षा लागली आहे पेरणी व लागवड करताना बरेच शेतकरी रासायनिक खतांचा डोस मात्रा देत असतो तर मान्सूनपूर्व लागवड झालेल्या कपाशी पिकासाठी व इतर पिकांना फळबागांना रासायनिक खतांची मात्रा देत असतो अशा वेळी शेतकऱ्यांना मुबलक प्रमाणात रासायनिक खतांची उपलब्धता लागते पण यावर्षी रासायनिक खते मिळण्यासाठी मोठ्या प्रमाणात अडचणींना सामोरे जावे लागत आहे शेतकरी दोन तीन वर्षांपासून मोठ्या अडचणीत असून केंद्र व राज्य सरकारने रा.खंताची व किंमत स्थिर ठेवावी अशी मागणी जुवार्डी शेतकरीपुत्र पाचोरा भडगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती पी ए पाटील यांनी व शेतकऱ्यांनी मागणी केली आहे या महत्वपूर्ण मागणीकडे जिल्हा कृषी अधिकारी व लोकप्रतिनिधी यांनी लक्ष ठेवावे अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. जिल्हाभरातील कृषी दुकानदार व मोठे घाऊक विक्रेते मुद्दामहून खरिप हंगामात रासायनिक खतांची कृत्रिम टंचाई निर्माण करतात आणि शेतकऱ्यांना अडवून करतात आणि विचारणा केली की रॅक लागला नाही खते मिळत नाही आम्हालाच जास्तीची ऑन किंमत देऊन घ्यावे लागते आम्ही काय करणार अशी सबब कारणं सांगून शेतकऱ्यांची दिशाभुल करतात आणि जास्तीची किंमत घेऊन लूटमार करतात ही बाब दरवर्षी प्रत्येक खरिप हंगामाच्या वेळी व मध्यतंरी अशी कृत्रिम टंचाई निर्माण केली जाते ही संपूर्ण लूटमार करणाऱ्यांची साखळीच असते. पिकांसाठी ज्यादा रक्कम देऊन रासायनिक खते खरेदी करतो परिणामी त्यांची मोठी लूट केली जाते. जिल्हाधिकारी यांनी अधिकारी यांचे संयुक्त भरारी पथक नेमावे.

## अमळनेरात मालकीणीसह महिला अन् आंबटशौकिनांवर कारवाई, गुन्हा दाखल

अमळनेर । प्रतिनिधी

गांधलीपुरा भागात अमळनेर पोलिसांनी छापा टाकून देहविक्री करणाऱ्या मालकीणी देहविक्री करणाऱ्या महिला आणि ग्राहकांना अटक करून पिटा कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. आतापर्यन्त पोलिसांनी केलेली ही सर्वात मोठी कारवाई आहे. गांधलीपुरा भागात वेश्या व्यवसाय सुरू असल्याच्या अनेक दिवसांपासून तक्रारी होत्या. पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांनी सापळा रचून खाजगी वाहनाने १ जुलै रोजी दुपारी साडे चार वाजता गांधलीपुरा भागात छापा टाकला. वेगवेगळ्या घरात व्यवसाय सुरू असल्याचे आढळून आले. पोलिसांनी मालकीण अन् पीडित महिलांना अटक केली आहे. यावेळी काही आंबटशौकिनांवर कारवाई करून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यावेळी आंबटशौकिन शाहरुख शेख असलम (वय ३०), रा. खडकपुरा पाळधी ता. धरणगाव, जि. जळगांव, समाधान मांगलु पाटील (वय ३२), रा. शिरसमणी ता. पारोळा, करण कैलास भिल (वय १७) रा. गलवाडे ता. अमळनेर, उदय दिलीप शितोळे (वय ४०), रा. भडगाव ता. भडगाव, निखील बापु बच्छाव (वय १९), रा. पिंप्री ता. धरणगाव, बस्तीलाल गोविंदा पाटील (वय ३३), रा. खडके खु. ता. एरंडोल, जावेद शेख सत्तार (वय ४२), रा. गांधलीपुरा, नामदेव वामनराव बडगुजर (वय ७८), रा. शिवनेरी नगर, चाळीसगाव यांना अटक केली आहे.

**यांनी केली कारवाई**

डीवायएसपी विनायक कोते यांची परवानगी घेऊन पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, पोलीस उपनिरीक्षक भगवान शिरसाठ, नामदेव बोरकर समाधान गायकवाड, पोहेकॉ गणेश पाटील, प्रदीप खैरनार, कैलास शिंदे, मिलिंद सोनार, विनोद भोई, विनोद सोनवणे, सिध्दांत शिसोदे, मंगल भोई, अमोल पाटील, जितेंद्र निकुंभे, विनोद संदाशिव, प्रशांत पाटील, नितीन कापडणे, मयूर पाटील, निलेश मोरे, राहुल पाटील, राहुल पाटील, उज्ज्वलकुमार म्हस्के, भूषण परदेशी, राहुल चव्हाण, नरेश बडगुजर, संजय सोनवणे, वाल्मीक पाटील, गणेश पाटील, उदय बोरसे, शामल पारधी, वैष्णवी पाटील होमगार्ड नीलिमा पाटील, ममता सुनील ठाकरे, मनीषा राजेंद्र वारुळे, नीलिमा ज्ञानेश्वर पाटील यांनी संयुक्तिक कारवाई केली.

# पारोळा येथे शासनाची फसवणूक केल्याबद्दल संस्थेविरुद्ध गुन्हा दाखल

पारोळा । प्रतिनिधी

एका शैक्षणिक संस्थेविरुद्ध शासनाची फसवणूक केल्याबद्दल गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत निलेश बापुराव वानखेडे रा. पारोळा यांच्याविरुद्ध दि. २ जून ते दि. १२ जून रोजी वेळोवेळी राजे संभाजी माध्यमिक विद्यालय पारोळा येथे फसवणूक यातील आरोपी मजकुर याने पुण्यश्लोक अहिल्यादेवी ट्रस्ट गोवंडी मुंबई संचलित या संस्थेच्या वामी समर्थ स्थलांतर बाबतचे आदेश किंवा मान्यतेचे आदेश नसताना बनावट कागदपत्र तयार करुन शाळा कार्यरत दाखवून दुसऱ्या शाळेच्या युडायस नंबर दाखवून सुरु ठेवून राजे संभाजी माध्यमिक विद्यालय पारोळा येथे आयोजित केले होते. त्या प्रशिक्षणास शिक्षकांना पाठवुन शासनाची व प्रशासनाची दिशाभूल करुन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. फिर्यादी हे जिल्हा परिषद जळगाव येथे शिक्षण विस्तार अधिकारी माध्यमिक या पदावर नेमणुकीस असून माझे कडेस अतिरिक्त उपशिक्षण अधिकारी म्हणून माझे कडेस चार्ज आहे. मला मा. कल्पना चव्हाण शिक्षणाधिकारी (माध्यामिक) जिल्हा परिषद जळगाव यांनी प्राधिकृत केल्यावरून मी खालील प्रमाणे फिर्याद देत की, मी महाराष्ट्र शासन विभागीय शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग नाशिक यांचे कडील जा क्र. शिवसं/नावि/माध्य-२/माशास्थालांतर/२०२१/१४८८५ दि.२१/०९/२०२१ अन्वये पुण्यश्लोक अहिल्यादेवी ट्रस्ट गोवंडी मुंबई या शाळेचे स्थलांतर नाव स्वामी समर्थ माध्यमिक विद्यामंदीर पारोळा ता पारोळा जि जळगाव येथे करण्याबाबत संदर्भ पत्रान्वये अटी शर्तीवर देण्यात आली होती. सदर अटी शर्तीच्या अनुषंगाने शाळेने स्थलांतरचे पत्र पुरवा म्हणून दिला असून शिक्षण विभाग माध्यमिक यांनी सदर पत्रावर वर्गाचा उल्लेख नाही. कुठुन ते कुठल्या वर्गांना परवानागी दिली, याचा बोध होत नाही. त्यामुळे सदर स्थलांतरचे पत्र शिक्षण विभाग यांना मान्य नाही. त्यामुळे स्थलांतरास शिक्षणधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद जळगाव यांची परवानगी दिसून येत नाही. त्यामुळे शासनाची शिक्षण विभागाची दिशाभूल झालेली आहे. तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी ट्रस्ट गोवंडी मुंबई संचलित या संस्थेच्या स्वामी समर्थ माध्यमिक विद्या मंदीर पारोळा यांना २०२४/२०२५ मध्ये अस्तित्वात नसताना तसेच शाळा स्थलांतर बाबतचे आदेश किंवा मान्यतेचे आदेश नसताना बनावट कागदपत्र तयार करुन शाळा कार्यरत दाखवून सुरु ठेवुन शासनाची व प्रशासनाची दिशाभूल करुन मुख्याध्यापक निलेश बापुराव वानखेडे यांनी प्राथमिक विना अनुदानित शाळेचा युडायस नंबर- २७०३१३०५०३७ वर इयत्ता १ ते ४ या वर्गा करता आहे. हे माहित असूनदेखील त्यांनी इयत्ता ५ ते १० या वर्गावर शिक्षक नसतांना सदर शाळेचा युडायस नंबर वापरुन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था जळगाव यांनी वरिष्ठ व निवड वेतन श्रेणीचे प्रशिक्षण हे दि. २ ते ६ जून रोजी ते दिनांक १२ जून रोजी पावेतो राजे संभाजी माध्यमिक विद्यालय पारोळा येथे आयोजित केले होते. त्या प्रशिक्षणास नऊ शिक्षकांना पाठवून शासनाची व प्रशानाची फसवणूक केली म्हणून माझी स्वामी समर्थ माध्यमिक विद्या मंदिर पारोळा मुख्याध्यापक निलेश बापुराव वानखेडे त्यांच्याविरुध्द पठाण फिरोजखान अमानुल्लाखान वय ५३ वर्षे, धंदा-नोकरी रा.२४६ शिवाजीनगर पाटील गल्ली यांनी फिर्याद दिल्यावरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक सचिन सानप यांच्या आदेशानव्ये गुन्ह्याचा पुढील तपास सफौ सुनिल रमेश पवार हे करीत आहेत.

### नशिबाची परीक्षा

शनिवार ५/७/२०२५

*** मिलन डे ***

१२६ ४५० ९०० **९-८** १७० १८९ ११६ | सिंगल ९-३-६

जोड ९२-१८-०३-६५-८७

*** कल्याण बाजार ***

१४० १५९ ५०० **५-६** १२४ २४० ६०० | सिंगल ५-७-९

जोड ५२-१६-३९-७४-६०

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे. कोणीही दुरुपयोग करु नये मो.९९७५४७९८२६

**गुरुवार ३/७/२०२५**

मेन बाजार - २७७-६१-१३७

मिलन ना. - ४६०-०९-३६०

**शुक्रवार ४/७/२०२५**

मेन बाजार -

कल्याण - ३६९-८९-१२६

मिलन डे - ५८०-३०-३३४

मिलन ना. -






अशोक DOLBY DIGITAL मे
आजसे रोजाना १२, ३, ६ व ९ बजेसे
भव्य विराट उद्घाटन, अणुबॉम्ब का स्फोट, दहशतवादी हल्ला, भूकंप, ॲक्शन, थ्रिलर से भरी दहशतवादी फिल्म
Ground Zero
(ग्राऊंड झिरो) (हिन्दीमे)
कलाकार - इमरान हाशमी, जोया हुसैन, मुकेश तिवारी इ.
(टिप - BMS पर एडवांस बुकिंग शुरु है।)


### कल्याण

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| १२-०५-२०२५ १७-०५-२०२५ | २३३-८२-३३६ | ५६९-००-३८९ | २७८-७४-५९० | २८८-८३-१५७ | ३८९-०८-४६८ | ६९०-५७-१६० |
| १९-०५-२०२५ २४-०५-२०२५ | ६९०-५७-१६० | १९०-००-१४५ | १६७-४७-३४० | २३७-२१-१३७ | १७९-७२-१२९ | ३९०-२६-३६७ |
| २६-०५-२०२५ ३१-०५-२०२५ | १४८-३०-१४५ | २५९-६१-१२८ | ४७०-१६-४५७ | १२५-८१-६७८ | ७९०-६५-६९० | ● |
| ०२-०६-२०२५ ०७-०६-२०२५ | २२९-३४-४५५ | ८९९-६२-१३८ | ७७८-२१-४७० | २४४-०२-३३६ | २५५-२३-२४७ | ११०-२४-२४८ |
| ०९-०६-२०२५ १४-०६-२०२५ | ५७९-११-३३५ | ९९०-८९-५६८ | ३५६-४०-५७८ | १६०-७६-७९० | १५८-४४-१६७ | १३३-७५-१५९ |
| १६-०६-२०२५ २१-०६-२०२५ | ५७८-०७-११५ | २२०-४२-१३८ | ४४६-४८-१२५ | १४८-३३-५९९ | २७८-७२-३९० | ६८९-३४-७७० |
| २३-०६-२०२५ २८-०६-२०२५ | १५९-५३-२४७ | १२५-८१-२३६ | २७९-८१-१३७ | २४८-४८-८०० | २५६-३१-३४४ | ३४९-६४-५९० |
| ३०-०६-२०२५ ०५-०७-२०२५ | १४५-०६-३४९ | ४७०-१४-६९९ | ३३४-०२-६६० | ४७०-१५-७८० | ३६९-८९-१२६ | |

### मिलन डे

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| १२-०५-२०२५ १७-०५-२०२५ | १३५-९६-२६८ | २८८-८९-३६० | ८९०-७३-५८० | १२०-३१-६६९ | ६६८-०८-१३४ | २५६-३४-२३९ |
| १९-०५-२०२५ २४-०५-२०२५ | २५६-३४-२३९ | ३८०-१२-३४५ | २७८-७०-१३६ | २६९-७०-३८९ | १२३-६०-१४५ | १६९-६७-२५० |
| २६-०५-२०२५ ३१-०५-२०२५ | ४७९-१७-३६८ | ५००-५४-२४८ | ५७०-२८-३६९ | ३४७-४०-१४५ | ६७७-०३-३४६ | ५७०-२८-४५९ |
| ०२-०६-२०२५ ०७-०६-२०२५ | ५७९-१५-२५८ | ४६८-८२-३४५ | २४८-४३-१६६ | ६९०-५९-२८९ | ४६८-८६-३४९ | ११४-६३-२५६ |
| ०९-०६-२०२५ १४-०६-२०२५ | २४५-१४-७७० | ४५०-९७-५५७ | ५६०-१२-११० | १९०-०४-१४९ | २३९-४४-२३९ | २४०-६४-२६६ |
| १६-०६-२०२५ २१-०६-२०२५ | ४८९-१२-५७० | २४६-२१-३४४ | १३७-१५-२५८ | ८००-८७-१६० | ४५७-६७-४५८ | ५९९-३५-११३ |
| २३-०६-२०२५ २८-०६-२०२५ | ३५०-८३-३५५ | ५७०-२१-४७० | १४५-०६-४५७ | २४७-३३-३०० | २४५-१०-१२७ | ४५९-८६-१५० |
| ३०-०६-२०२५ ०५-०७-२०२५ | २७८-७४-६८० | ५६७-८९-११७ | ८९९-६२-४९९ | १६७-४६-२५९ | ५८०-३०-३३४ | |

### मिलन नाईट

| सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|
| १६७-४४-१४९ | ४६७-७९-२७० | २३५-०६-६०० | १७९-७४-२३९ | १७०-८२-३९० | ५८०-३२-२३७ |
| ५८९-२९-१९९ | ७८०-५६-१२३ | २६७-५०-१४५ | १२६-९५-१५९ | ११६-८१-१५५ | ७००-७७-४६७ |
| १२८-१८-४७७ | १४६-१७-८९० | ४६०-०३-५९९ | १६७-४१-३९९ | ५५८-८७-२५० | ३९९-१३-२५६ |
| २२४-८१-४७० | ६७७-०६-३५८ | १२३-६९-९०० | ३६९-८६-२६८ | १५०-६४-२२० | ३६८-७१-४७० |
| १६९-६०-४७९ | ४९०-३७-३७० | २३५-०५-७८० | २३५-०३-६८९ | १७७-५५-२५८ | ३८९-०२-५८९ |
| ४९९-२२-६८८ | २९०-१३-३५५ | ५७०-२९-३६० | २८०-०१-५६० | १७७-५९-३७९ | ४४७-५६-३६७ |
| २५०-७०-२९९ | १३६-०९-११७ | २७९-८७-२७८ | ३५६-४०-४७९ | ५६०-१८-१७० | २३६-१०-२८० |
| २४५-१९-५५९ | ३६०-९८-४५९ | ३५६-४२-१२९ | ४६०-०९-३६० | | |


देशदूत 'CLASSIFIED' छोटी जाहिरात तुमची, समाधान आमचे प्राधान्य!

सूचना वृत्तपत्रातुन प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी जाहीरात संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची 'देशदूत'वृतपत्र समुह कोणतीही हमी घेत नाही,जाहीरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता न झाल्यास त्याच्या परीणामाबद्दल 'देशदूत' वृतपत्र समुहाचे मुद्रक, प्रकाशक,संपादक वमालक तसेच जाहीरात एजनसीचे मालक जवाबदार राहणार नाही याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी

**ज्योतीषविषयक**

जीवनातील कठिन व जटिल समस्यांचे, शिक्षण, नौकरी, व्यवसाय, प्रेम विवाह, कोर्ट कचेरी, स्वास्थ्य, कोणतेही कामात बाधा येणे, १०१% कायमस्वरूपी प्रभावी उपाय।तीन पीढ़ी पासून, श्रीभृगु ज्योतिष (मां गायत्री उपासक), गुजराल पेट्रोल पंप, जळगाव मो. ९८२२७७४१५१ (व्हीएम २५/६/२०२६)

**फेंगशुई**

सुख समृध्दीसाठी बिना तोड-फोड वास्तुदोष निवारण पारंपरीक वास्तु शास्त्र प्राचीन फेंगशुई द्वारे सर्व समाधन,फेंगशुई तज्ञ सुर्यवंशी **9881462286,** (VM 23/05/26)

**दारु बंदीचा गुरुमंत्र**

द ग्रेट साईंटिस्ट...(Best Doctor & GOLD MEDAL AWARDED) व्हॉटसॲप डॉ.पालवे, ॲडमिट करा...।। नका करु...,पेशंटला सांगा....।। नका सांगु... पेशंटला आणा....।। नका आणु.... * व्यसन पेंशंटचे... विश्वास तुमचा...उपचार आमचे... Lifelong व्यसनापासुन १०० टक्के मुक्ती....सर्व सुविधांना परीपुर्ण :- *व्यसनमुक्ती Special पॅक,मेडिसीन,इंजक्शन स्प्रे,ड्रॉप,ऑपरेशन,गोळी टाकणे, मंत्रोपच्चार...ॲडमिट सुविधा... *(विशेष)गरीबांसाठी फी मध्ये सवलत... तर आजच संपर्क: 9552619752.डॉक्टर पालवे, नशामुक्ती केंद्र,वरणगांव.**(VM.10/01/26.CRINIV-2425JL/CRG00504)**

छोटी जाहिरात तुमची, समाधान आमचे प्राधान्य!

**वॉटर प्रुफिंग**

KM वॉटर प्रुफिंग 44 वर्षांपासून कामाचा अनुभव टेरेस, बाथरुम, संडास, बेसमेंट, पाण्याच्या टाकीची लिकेज 5 ते 10 वर्षांच्या 100% गॅरंटीने विनातोडफोड करुन मिळेल. संजय कुमावत-9822275444, संतोष कुमावत-7038818444 (18/7/25)

**उपचार सर्वांसाठी सर्व आजारांसाठी**

जुनाट सर्दी,जुनाट गुडघेदुखी,चालता, बसता,उठता न येणे.जुनाट संधीवात/चिकून गुनिया,जुनाट ॲलर्जी,जुनाट अर्धशिशी,जुनाट मुळव्याध,एचआयव्ही ,भुक लागत नाही?वजन कमी ? थकवा जाणवतो?LOW CD4 COUNT? उपचार सर्वांसाठी सर्व आजारांसाठी,भेटा-अहमदनगरचे सुप्रसिध्द डॉक्टर पालवे,वरणगांव संपर्क:9552619752**(VM.10/01/26. CRINIV-2425JL/CRG00505)**

**इलेक्ट्रॉनिक वजनकाटे**

**मान्सुन ऑफर जुने द्या नविन घ्या**

एक्सचेंज ऑफरमध्ये फिनिक्स,सॅनसुई, हॅवल्स, एक्सपर्ट, इगल सर्व ब्रान्डेड कंपन्याचें इलेक्ट्रॉनिक वजनकाटे होलसेल किमंतीत मिळवा,अधिकृत विक्री व दुरुस्ती,धनश्री इलेक्ट्रॉनिक्स, १७९,डी-विंग,गोलाणी मार्केट,जळगाव **9823095738.(VM 07/07/26).**

**१००% व्यसनमुक्ती**

*गॅरंटीने सोडवा.दारु + गुटखा + सिगरेट + बीडी + मावा+ तंबाखु + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा+ ताडी + स्नेकबाईट + व्हाईटनर व्हाइटपावडर + हिरॉईन + चरस + कोकेन+MD + L.S.D Dot पेपर +झोपेची गोळी + इंजेक्शन, संपर्क:9552619752.,www.drpalvenashamuktikendra.in डॉक्टरपालवे,नशामुक्ती केंद्र,वरणगाव. (VM.10/01/26.CRINIV-2425JL/CRG00504)